## जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 22.03.2020.
6. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांक:- 31/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये दि. 31.03.2020 पर्यंत खालील नमूद अत्यावश्यक आस्थापना वगळता उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लॉकडाऊनचे आदेश पारित केले होते. ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये दि. 14 एप्रिल 2020 पर्यंत संपूर्ण भारत देशभर लॉकडाऊनचे आदेश भारत सरकारने पारित केलेले आहेत. संदर्भ क्र. 7 अन्वये महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 5 चे आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी **उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये खालील आस्थापना वगळून.**

1. शासकीय / निमशासकीय कार्यालये.
2. पिण्याचे पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा व्यवस्थापन करणा-या आस्थापना.
3. सर्व बँका.
4. दूरध्वनी व इंटरनेट सेवा पुरवठा करणा-या आस्थापना.
5. अन्न, भाजीपाला, दूध व किराणा पुरविणा-या आस्थापना.



Scanned by CamScanner

6. दवाखाने, वैद्यकीय सेवा व औषधी दुकाने.
7. विद्युत पुरवठा, ऑईल व पेट्रोलियम व ऊर्जा संसाधने.
8. प्रसार माध्यमे, मिडीया.
9. अत्यावश्यक सेवा देणा-या आय. टी. आस्थापना.

**वरील आस्थापना व दुकाने वगळून उस्मानाबाद जिल्हयातील सर्व आस्थापना व दुकाने दिनांक 14 एप्रिल 2020 पर्यंत बंद करणेबाबत आदेशित करीत आहे.**

या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., उस्मानाबाद, पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद, सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद, सर्व तहसिलदार, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत, ग्रामसेवक, तलाठी जिल्हा उस्मानाबाद इत्यादींची असेल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 31.03.2020 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

31/3/20

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

प्रत:- 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
7. उपविभागीय अधिकारी सर्व तथा INCIDENT COMMANDER जिल्हा उस्मानाबाद.
8. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
9. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
10. तहसिलदार सर्व तथा INCIDENT COMMANDER जिल्हा उस्मानाबाद.
11. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

31/3/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**



Scanned by CamScanner